ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013

# सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या सद्यस्थितीचा अभ्यास

**प्रा. सुरेंद्र चंद्रकांत हेरकळ,**
**पीएच.डी. विद्यार्थी,**
**शिक्षणशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ,**
**पुणे.**

**सारांश :**

शासनाने सन 2010 –11 या शैक्षणिक वर्षापासून इ. 1 ली ते 8 वी साठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपध्द्ती लागू केली परंतू आजही सदर कार्यपध्दतीची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होत नसल्याचे दिसून येत आहे. याच्या सदस्थितीचा अभ्यास करणे गरजेचे असल्यामुळे सर्वेक्षणाव्दारे संशोधन कार्य करण्यात आले. त्यामध्ये शिक्षकांना सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाबाबत अडचणी निर्माण होतात. व त्याच्या कार्यवाही मध्ये अडथळे असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**मुख्य संज्ञा** : सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन

**प्रस्तावना** :

भारतामध्ये 1857 साली कलकत्ता,मद्रास आणि मुबंई विद्यापीठांची निर्मिती झाली. या विद्यापीठांमध्ये विद्यापीठीय स्तरावरील परीक्षा घेतल्या जात होत्या.त्या वेळेपासूनच परीक्षेची परीणामकारकता व सहेतुकता आणि त्याचा जीवनाच्या व शिक्षणाच्या इतर घटकांशी संबंध याबाबत अनेक चर्चेच्या बाबी निर्माण झालेल्या आहेत. 2004 पर्यंत सुमारे 130 शिक्षण आयोग, चौकशी समित्या,पुर्नरचना समित्या इत्यादी नेमण्यात आल्या, त्या सर्वांनी त्यांचे अहवाल देखील योग्य वेळी शासनाकडे सादर केले. यातील बहुसंख्य समित्या/आयोगांच्या अहवालामध्ये प्रचलित परीक्षा पध्दतीवर ताशेरे ओढण्यात आले होते व त्यात आमूलाग्र बदल करण्याच्या स्पष्ट शिफारशी करण्यात आल्या होत्या. पण दुर्देव म्हणजे या सर्व शिफारशी अहवालातच राहिल्या आणि सदोष परीक्षा सन 2009 पर्यंत आहे तशीच राहिली होती.एन.सी.एफ 2005 मध्ये परीक्षापध्दतीच्या स्वरूपात बदल करण्याविषयी मांडलेल्या सूचनांचा विचार करून त्या अमलात आणण्याची खरोखर गरज होती. 1 एप्रिल 2010 रोजी पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांनी सहा ते चौदा वयोगटांतील मुलांना शिक्षणाचा हक्क बहाल करणारा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 कायदा मंजूर करून तो लागू झाल्याची जाहीर घोषणा केली. सदर अधिनियमामधील कलम 29 (1) व (2) नुसार सन 2010–2011 या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिली ते आठवीसाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपध्द्ती लागू करण्यात आली.

त्यानुसार इयत्ता आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना कोणत्याही बोर्डाची परीक्षा द्यावी लागणार नाही. त्याअन्वये महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने दिनांक 20 ऑगस्ट 2010 रोजी शासन निर्णय क्र. पीआरई/2010/136/10/प्राशि–5 नुसार सन 2010–11 या शैक्षणिक वर्षापासून इ. 1ली ते 8 वी साठी (प्राथमिक स्तर)सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपध्दती लागू करण्यात आली.

**संशोधनाची गरज :**

शासनाने सन 2010 –11 या शैक्षणिक वर्षापासून इ. 1 ली ते 8 वी साठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपध्द्ती लागू केली परंतू आजही संपूर्ण महाराष्ट्रात प्राथमिक स्तर म्हणून इ.1 ली ते 7 वी पर्यंतच्या इयत्तांचा विचार करण्यात येतो व त्यांचा समावेश प्राथमिक स्तरात आहे आणि कोणतेही धोरण किंवा निर्णय हा फक्त सातवी इयत्तेपर्यंत राबविण्यात येतो. इयत्ता आठवी हा वर्ग आजही प्राथमिक स्तराला जोडला गेलेला नसल्यामुळे या इयत्तेचा समावेश माध्यमिक स्तरामध्ये करण्यात येतो. 'सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपध्दती' इयत्ता आठवीपर्यंत लागू करण्यात आली आहे. परंतू या मूल्यमापनाच्या कार्यवाहीसाठी इयत्ता आठवीकडे दूर्लक्ष होत आहे. म्हणून इयत्ता आठवीमध्ये या मूल्यमापनाची सद्यस्थिती कशा प्रकारे आहे हे अभ्यासण्यासाठी सदर संशोधन करण्यात आले.


**उद्दिष्टे :**


1. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांचे हिंदी विषयाचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या सद्यःस्थितीचा अभ्यास करणे.
2. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दतीचा अवलंब करताना येणा–या अडचणी अभ्यासणे.
3. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दतीविषयी अभिप्राय जाणून घेणे.

**संशोधनाची कार्यवाही :**

सदर संशोधनासाठी पुणे जिल्हयातील मराठी माध्यमाच्या इयत्ता आठवीला हिंदी शिकवणारे शिक्षक सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दतीचा एक कार्यपध्दती म्हणून किती व कसा उपयोग करतात याचा अभ्यास करणे, तसेच सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दतीचा अवलंब करताना येणा–या अडचणी अभ्यासणे आणि या मूल्यमापन पध्दतीविषयी अभिप्राय जाणून घेणे ही समस्या निश्चित झाल्यानंतर संशोधकाने सर्वेक्षण ही अभ्यासाची पध्दती निश्चित केली. पुणे जिल्हयातील 14 तालुक्यातील 15 विभागात असलेल्या मराठी माध्यमाच्या 979 माध्यमिक शाळांपैकी 25 टक्के न्यादर्श निवड सहेतूक नमुना निवडीव्दारे करण्यात आली आणि 245 शिक्षकांची कडून प्रश्नावलीव्दारे माहिती गोळा केली.

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013




सदर संशोधनासाठी माहिती गोळा करताना उपयोगात आणलेल्या प्रश्नामध्ये चार भाग करण्यात आले होते. 1. सर्वसामान्य माहिती 2. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन – जाणीव 3. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यवाहीतील अडचणी 4. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यवाहीत सुधारणेसाठी सूचना या चार भागांमध्ये एकूण 52 प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता.

**निष्कर्ष** :

1. 40 टक्के शिक्षक इ. 5 वी ते 10 वी या सर्व इयत्तांना अध्यापन करतात तर 60 टक्के शिक्षक इ. 8 वी ते 10 वी या इयत्तांना अध्यापन करतात. परिणामी जे शिक्षक इयत्ता 9 वी व 10 वीला ज्या पारंपारिक पध्दतीने मूल्यमापन करतात त्याच पध्दतीने इयत्ता आठवीचे सुध्दा मूल्यमापन करतात.
2. 35.77 टक्के शिक्षकांनी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपध्द्तीचे प्रशिक्षण घेतलेले नाही.
3. 67.11 टक्के शिक्षकांना सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची गरज स्पष्ट झालेली नाही.
4. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनासाठी 51 टक्के शिक्षकांनी अध्यापनात थोडा बदल केलला आहे.
5. 92.67 टक्के शिक्षकांना आजही सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या कार्यवाहीत अडचणी असल्याचे सांगितले आहे.
6. 92.09 टक्के शिक्षकांच्या मते, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या अंमलबजावणीमुळे विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दूर्लक्ष व बेशिस्तीचे प्रमाण वाढलेले आहे.
7. 91.37 टक्के शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या आकारिक मूल्यमापन करताना अडचणी येतात.
8. 80.60 टक्के शिक्षकांच्या मते, विद्यार्थी संख्या हा सर्वात मोठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनातील अडथळा आहे.
9. 75.43 टक्के पालक सदर मूल्यमापन पध्दतीबाबत नकारात्मक मत प्रदर्शित करतात.

10. 68.53 टक्के शिक्षकांनी सदर कार्यपध्दतीस विरोध दर्शविला आहे.

11. 54.31 टक्के शिक्षकांनी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाविषयीच्या प्रशिक्षणाची अपेक्षा व्यक्त केली आहे.

सदर संशोधनाव्दारे इयत्ता आठवी या वर्गावर सद्यस्थितीत सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची असलेली परिस्थिती मांडण्यात आलेली आहे.

**संदर्भ :**

1. पाल, यश. (अध्यक्ष.) (डिसेंबर 2009). राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005. नवी दिल्ली : राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
2. पाटील,विजय ( संपा.) (ऑगस्ट 1996), षिक्षण प्रवाह साळी,व. झा.–परीक्षा सुधार प्रक्रिया (लेख) (चौथी आवृत्ती) पुणे : म.राज्य षै.सं.व प्र परिषद.
3. चेंगप्पा, राज. (2005) Examination killer. इंडिया टुडे
4. Agrawal Mamta (2005). "Examination Reform Initiatives in India",Journal of Indian Education" Vol. 31, no.1,pp.27-35.
5. Dr. Manjula P Rao and Dr. Purushotama Rao Mysore, India "Effectiveness of Continuous and Comprehensive Evaluation Over the Evaluation practices of teachers." Retrievedfromhttp://conference.nie.edu.sg/paper/Converted%20Pdf/ab00673.pdf
6. www.jstor.org. Article – By - Ravindra h. Dave& walker h.Hill. "Educational and social dynamics of the examination system in India.
7. Government of India.(1986) National Policy on Education,(1986). Delhi.
8. Singh Avtar(2010); Grading System for schools; journal of Indian Education.pp.105-111
9. http://www.punezp.org/educmadhyamic.html 3 June 2012